फक्त सभासदांसाठी
वर्ष ४२वे, अंक १ला * मे २०२३

सभा : मंगळवारी रात्री ७.०० वा.
रोटरी हॉल, शिक्षण महाविद्यालय,
SNDT महाविद्यालय, कर्वे रोड, पुणे ३८

# स्नेह सेवा

## मैत्रेय चॅरिटेबल सोसायटी, पुणे

* अध्यक्ष *
डॉ. नीलिमा भडभडे
मो. ९७६७९१६५४०

नोंदणी क्र. MAH /1528/06/Pune, दिनांक १ सप्टेंबर २००६
पत्रव्यवहारासाठी पत्ता :
द्वारा, प्रबोध, १०७०, शुक्रवार पेठ, सुभाषनगर लेन नं. ६, पुणे ४११००२.
snehseva1981@gmail.com

* संपादक *
उज्ज्वला नाईक
मो.९८१९३२०५७७

## अध्यक्षीय

मैत्रेय चॅरिटेबल संस्था आणि स्नेहसेवाच्या सर्व सदस्यांनी माझ्यावर २०२३-२४ ची अध्यक्ष म्हणून जबाबदारी सोपावली आहे. सर्वांनी संपूर्ण सहकार्याचे आणि कोणतेही काम करायला तयार आहोत असे आश्वासन दिले आहे. यामुळे या वर्षात नवे उपक्रम राबविण्यासाठी आत्मविश्वास वाढला आहे.

२०२२-२३ हे वर्ष लॉकडाउन,आणि त्यानंतर प्रकृतीची खबरदारी म्हणून काही काळ, अनिश्चिततेचे गेले. काही काळ प्रत्यक्ष भेटी आणि सभा होवू शकल्या नाहीत. तरीही सर्व कार्यक्रम आणि प्रकल्पांची कामे श्री सुधीर पळसुले आणि त्यांच्या कार्यकारिणीने अत्यंत समर्थपणे पूर्ण केली. त्यांचे अभिनंदन.

आता प्रत्यक्ष भेटाभेट शक्य आहे. त्यामुळे प्रकल्प पुढे नेणे, वाढवणे आणि त्यांचा लाभ अधिकाधिक लाभार्थींपर्यंत पोहोचविणे ही आमच्या कार्यकारिणीवर जबाबदारी आहे. देणग्या-द्रव्य-निधी कधीही कमी पडणार नाही, कामे निर्माण करा आणि पूर्ण करा अशी अनुभवी सदस्यांनी आम्हाला खात्री दिली आहे. आणि सर्व सभासद कोणतेही कार्य पुढे नेण्यास तयार आहेत.२०२३-२४ च्या कार्यकारिणीचे सदस्य हे साधण्यास सक्षम व उत्साही आहेत.

२०२३-२४ साठी जे करायचा मानस आहे ते असे: मैत्रेय व स्नेह-सेवाची दृष्यमान्यता (visibility) वाढवायची आहे. त्यासाठी माध्यमांचा वापर करून संस्था व त्यांची माहिती अधिकाधिक लोकांपर्यंत पोचवणे आवश्यक आहे. त्यासाठी संस्थेची वेब-साईट सक्रीय करणे, व्याख्यांनांना मुक्त प्रवेश देणे, वर्तमान-पत्रात कार्यक्रम जाहीर करणे असे केल्यास संस्थेचा जनसंपर्क वाढेल. नवीन सभासद जोडायचे आहेत, ज्यामुळे प्रकल्पांची संख्या आणि व्याप्ती वाढविता येईल. निधी संकलन वाढवायचे आहे. सदस्यांना एकमेकांबरोबर आणि संस्थेबरोबर जोडण्यासाठी संगणक आणी डिजिटल प्रणाली चा वापर वाढवायचा आहे. प्रत्येक सदस्याचा त्याच्या आवडीनुसार संस्थेच्या कार्य आणि प्रकल्पांमध्ये सहभाग वाढवायचा आहे. सदस्यांच्या कुटुंबियांना, ते सदस्य होवोत किंवा ना होवोत, स्नेहसेवा मध्ये सामावून घ्यायचे आहे. असे प्रकल्प हाती घ्यायचे आहेत ज्यामध्ये सदस्य स्वतः व व्यक्तीशः सहभागी होतील. हे सर्व या वर्षात सुरु व सध्या करूयात.

२०२३-२४ वर्षासाठी सर्वांना मनःपूर्वक शुभेच्छा.

**नीलिमा भडभडे**
अध्यक्ष

## संपादकीय

स्नेहसेवाच्या सर्व स्नेहीजनांना नमस्कार.

गेल्या दोन अडीच वर्षापासून आपण कोरोनाशी झुंज देवून त्यातून बाहेर पडलो. कोरोनामुळे आपण वार्तापत्राद्वारे संवाद साधू शकलो नाही. परंतु आता नव्या उत्साहाने, जोमाने आपण वार्तापत्र सुरू करीत आहोत. नवीन वर्षासाठी सर्वांना शुभेच्छा. ४१ वर्षाची यशस्वी वाटचाल करून, स्नेहसेवेने ४२व्या वर्षात पदार्पण केले आहे.

वार्तापत्र गटात (गट क्र. ९) सभासद आहेत: उज्ज्वला नाईक, गीता भुर्के, सुनीता वाघ, डॉ विद्या शर्मा, रीताराणी शितोळे, शुभदा घाटपांडे व नीना खरे. आमच्यावर वार्तापत्राची जबाबदारी सोपवून जो विश्वास दाखवला त्याबद्दल वार्तापत्र गटातील माझे सहकारी व मी, आपले अध्यक्ष व कार्यकारी मंडळ यांना धन्यवाद देतो. सर्वांच्या सहकार्याने ही जबाबदारी आम्ही पार पाडू शकू.

पुढच्या अंकापासून आपल्या सदस्यांच्या जीवनातील चांगल्या घडामोडी अंकामध्ये प्रसिद्ध करू. जसे, कोणी परदेशी किंवा ट्रीप ला गेले, एखादा अभ्यासक्रम पुरा केला, मुले नातवंडे परीक्षा पास झाली, पुस्तक प्रकाशित झाले. असा मजकूर, स्वतःविषयी किंवा दुसऱ्या सभासदाबद्दल, सौ शैलजा पळसुले यांना कळवावा. त्यांचा फोन (whatsapp सुद्धा) ९७६६०३८२०१ असा आहे.

**उज्ज्वला नाईक**
संपादक.

## पदग्रहण समारंभ २०२३

२०२३ ह्या नूतन वर्षातील माहे एप्रिल मधील पहिला मंगळवार, नवीन अध्यक्षांच्या पदग्रहण समारंभासाठी एस एन डी टी कॉलेजमधील रोटरी क्लबचा हॉल नयन मनोहर रांगोळ्या व फुलांच्या सजावटीने कार्यक्रमासाठी सज्ज होता. वातावरण मोठे प्रसन्न होते. येणाऱ्या प्रत्येक सभासदाच्या चेहेऱ्यावर नवीन हॉलचे औत्सुक्य दिसत होते. घरात एखादे मंगलकार्य असावे त्याप्रमाणे सर्व मंडळी, विशेषतः महिलावर्ग, नटून थटून कार्यक्रमासाठी आलेली होता. सर्वांचे पेढा व कॉफी देऊन स्वागत करण्यात आले.

दि. ४ एप्रिल २०२३ रोजी संध्याकाळी ठीक ०६.३० वाजता पदग्रहण कार्यक्रमास सुरुवात झाली, उपस्थित सभासदांनी नेहेमीच्या प्रथेप्रमाणे प्रार्थना म्हटली. स्नेहसेवेचे अतिशय ज्येष्ठ सभासद लेखक, व्याख्याते असलेले प्रा. शाम भुर्के यांनी सूत्रसंचालन केले, त्यामुळे कार्यक्रम रंगतदार व खुसखुशीत होणार हे नक्कीच झाले. प्रथम त्यांनी मैत्रेय चॅरिटेबल ट्रस्ट व स्नेहसेवेचा इतिहास व माहिती सांगितली. १५ ऑगस्ट १९८१ पासून गेली ४२ वर्षे अखंडपणे स्नेह आणि सेवा हा यज्ञ चालू असल्याचे, त्यांनी सांगितले. इतर संस्था व स्नेहसेवा यातील फरक सांगताना, इथे समाधान मिळते, सभासद आपुलकीने एकजुटीने रहातात असे सांगितले.

सभेचे अध्यक्ष आर्कीटेक्ट विश्वकुमार बडवे यांचे हस्ते प्रमुख पाहुण्या श्रीमती वैजयंती जोशी यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर दीपप्रज्वलन करून कार्यक्रमास सुरुवात झाली.

उपाध्यक्ष श्री अविनाश जोशी यांनी गतवर्षातील कार्यक्रमांचा आढावा घेतला. मावळते अध्यक्ष श्री सुधीर पळसुले यांनी सैनिक स्नेहच्या कार्यक्रमाचा आवर्जून उल्लेख केला. दिवाळीच्या पहिल्या दिवशी जम्मू काश्मीरमधील पाकिस्तान बॉर्डर व तवांग सियाचीन जेथे १६००० फुटांवर, –१५ डिग्री तापमानात आपल्या देशाचे रक्षण करणाऱ्या जवानांना मिळालेली मिठाई व त्यांचे कृतज्ञता दर्शविणारे आलेले १५० फोन, हा आमच्या कार्याचा खूप समाधान देणारा क्षण ठरल्याचे त्यांनी सांगितले. चितळे बंधू मिठाईवाले व निवारा संस्था यांच्या सहकार्याने स्नेहसेवा संस्थेने मिठाईचे एकूण ६००० बॉक्सेस सैनिकांना वितरीत केले. जणू काही घरूनच मिठाई आल्याची भावना सैनिकांनी व्यक्त केली तेंव्हा अंगावर रोमांच उभे राहिले. कोरोना काळात online कार्यक्रम सुरु झाले व सर्व सभासदांनी online बाबतची माहिती शिकून घेतल्याचे श्री पळसुले यांनी सांगितले व त्याबाबत आनंद व्यक्त केला.

रुग्णसेवेबद्दल श्री विनोद दफ्तरदार, डॉ.श्री अरुण निरंतर व डॉ. श्री हरीश महाजन यांचा सत्कार करण्यात आला. श्री विनोद दफ्तरदार ह्यांना कार्याबद्दल ट्रॉफी दिली. सर्व दवाखान्यांमध्ये मदत करणाऱ्या व्यक्ती, डॉ. राहुल कनोजिया, श्रीमती सुनंदा जप्तीवाले, श्रीमती उषा पळशीकर, श्री श्रीकांत वाईकर, श्री सुरेश तुरे व श्रीमती प्रांजली भालेराव यांना सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

आपल्या सभासद सौ राधा व श्री मुकुंद संगमनेरकर ह्यांची कन्या सई संगमनेरकर ही एम.बी. बी. एस. झाल्या प्रीत्यर्थ तिचाही सत्कार करण्यात आला. ह्या आनंदाप्रीत्यर्थ आजचे स्नेहभोजन संगमनेरकर कुटुंबीयांतर्फे देण्यात आले.

या नंतर अधिकार हस्तांतरणाचा मुख्य कार्यक्रम पार पडला. मावळते अध्यक्ष श्री सुधीर पळसुले यांनी श्रीमती निलिमा भडभडे व मावळते उपाध्यक्ष श्री अविनाश जोशी यांनी श्रीमती सुनीता वाघ यांचेकडे अनुक्रमे अध्यक्ष व सचिव पदाची सूत्रे सोपवली.

त्यानंतर नवीन अध्यक्षा श्रीमती नीलिमा भडभडे यांचा परिचय करून देण्यात आला. अतिशय हुशार अशा निलिमाताई ह्या LL.B. च्या तीनही वर्षात विद्यापीठात प्रथम आल्या होत्या व ILS कॉलेजच्या बेस्ट स्टुडेंट होत्या. १३ वर्षे दिवाणी वकिली केल्यानंतर ILS मध्ये १६ वर्षे प्राध्यापिका म्हणून त्यांनी काम केले. संगणकाचा पुरेपूर उपयोग करणाऱ्या असा त्यांचा लौकिक आहे. एक उत्कृष्ट प्राध्यापिका म्हणून त्या परिचित आहेत. कराराचा कायदा हा त्यांच्या आवडीचा विषय असून त्यावर त्यांनी तीन पुस्तके लिहिली आहेत. कायद्यासारख्या रुक्ष म्हणविल्या जाणाऱ्या विषयातल्या तज्ज्ञ असूनसुद्धा त्यांनी त्यांच्या घराच्या गच्चीवर सुंदर बाग फुलवली आहे. ह्या छंदा सोबतच शिवणकाम, योगाभ्यास, लेखन, सल्लागार, अशा अनेक आवडी जपत, इतक्या व्यस्त जीवनक्रमात असूनही त्यांनी अध्यक्षपदाची धुरा सांभाळण्याचे कबुल केले ही गौरवाची बाब आहे.

सभासदांकडून संपूर्ण सहकार्य मिळेल हा विश्वास अध्यक्ष श्रीमती नीलिमा भडभडे यांनी व्यक्त केला. श्रीमती वैजयंती जोशी यांचे हाताखाली काम करताना आपण खूप गोष्टी शिकलो, ज्याचा आता खूप उपयोग होईल. एखादी संस्था चालवताना, विविध स्वभावाच्या व्यक्ती असतात त्यांच्याशी जुळवून घेताना, चुका माफ करून, बाजूला टाकून पुढे जायचे, त्यांना कामात निर्णय स्वातंत्र्य द्यायचे, आणि प्रत्येक सभासदाने विश्वासाने सांगितलेल्या गोष्टींचा इतरांकडे उहापोह न करणे, ह्या बाबी विचारात घ्याव्या लागतात. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे संस्थेचे हित जपणे. २०२३ –२४ ची उद्दिष्टे सांगताना निलिमाताईंनी व्हिज़िबीलीटी वाढवणे, संस्थेची माहिती वेब साईट वर टाकणे, संस्थेचा जनसंपर्क वाढवणे, ऑनलाईन कॉम्प्युटरचा वापर करणे, नवीन सभासद

जोडणे, संस्थेच्या कार्यक्रमात प्रत्येक सभासदाने भाग घ्यावा ह्याबद्दल जागृती करणे, कार्यक्रमात कुटुंबियांना सहभागी करून घेणे ह्या मुद्द्यांवर भर दिला. त्यानंतर कार्यकारिणीचे नवीन सदस्य जाहीर करण्यात आले,

| | | |
|---|---|---|
| उपाध्यक्ष | – | डॉ. राधा संगमनेरकर |
| उपाध्यक्ष क्र. २ | – | श्री अविनाश जोशी |
| चिटणीस | – | श्रीमती सुनीता वाघ |
| सहचिटणीस | – | श्रीमती नीला सरपोतदार |
| खजिनदार | – | श्री अरविंद भडकमकर |
| सहखजिनदार | – | श्री विजय बागुल |
| सदस्य | – | डॉ. विद्या शर्मा |
| सदस्य | – | श्री भालचंद्र अंबुलकर |
| सदस्य | – | श्री प्रदीप वाघ |

त्यानंतर प्रमुख पाहुण्या श्रीमती वैजयंती जोशी यांचे भाषण झाले. त्या पुण्यातीलILS लॉ कॉलेजच्या २५ वर्षे प्राचार्य होत्या. स्नेहसेवेची विस्तृत माहिती कळली, व ही संस्था सेवाभावी असल्याचे कळले असे त्या म्हणाल्या, त्याच्या ओघवत्या शैलीतील भाषणात, समाजामध्ये असलेली लाचलुचपत, हुंडा घेणेची प्रथा, विवाह सोहोळ्यात वारेमाप खर्च, सामाजिक असुरक्षितता, भिन्न असलेले स्त्री पुरुष प्रमाण, मुलगाच हवा हा आग्रह, अशा महत्वाच्या विषयांवर त्यांनी प्रकाश टाकला. आपल्या अनेक वर्षांच्या अनुभवावर आधारित समाजाने कसे असावे, राष्ट्र हित कशात आहे, मूल्यांची जोपासना करणे कसे गरजेचे आहे, अशा अत्यंत महत्वाच्या विषयांवर आपले मौलिक विचार त्यांनी मांडले.

प्रमुख पाहुण्यांच्या भाषणानंतर स्नेहसेवेचे संस्थापक सदस्य आर्किटेक्ट विश्वकुमार बडवेंनी आपले विचार मांडले, त्यात स्नेहसेवा अनेक प्रकारचे उपक्रम राबवत असते, संस्थेचा प्रवास हा एखाद्या प्रवाहासारखा सतत वाहता हवा, नवीन अध्यक्षांच्या कल्पना अमलात आणाव्यात, प्रत्येकाने आपापल्या कल्पना संस्थेत मांडाव्यात व त्यावर एकत्र बसून चर्चा करून नवीन उपक्रम हाती घ्यावेत, ह्यावर त्यांनी भर दिला.

आभार प्रदर्शन सौ सुनीता वाघ ह्यांनी केले. अशाप्रकारे संपूर्ण कार्यक्रम अतिशय आखीव रेखीव नेटका व दिमाखदार पार पडला.

ह्या वर्षाच्या अंकातील वार्तांकनाची जबाबदारी माझ्यावर सोपविल्याने थोडे दडपण आले आहे, पण आपल्या सर्वांच्या सहकार्याने ही जबाबदारी नीट पार पडेल अशी मला खात्री वाटते.

**उज्वला नाईक**

## गप्पा मंगलाताई गोडबोले यांच्याशी

दिनांक ११.४.२०२३ मंगळवार हा दिवस, साहित्य क्षेत्रात गेल्या ५० वर्षांपासून आपला ठसा उमटविलेल्या ज्येष्ठ लेखिका सौ मंगलाताई गोडबोले यांच्या व्याख्यानाने सजला. सौ मंगलाताई यांची ओळख श्री भुर्के यांनी करून दिली.

त्यांच्या लिखाणात सामाजिक जाणिवेला नेहेमी वरचे स्थान असते, त्यांच्या साहित्यात विनोदी लेखनाचाही समावेश आहे कोणतेही ललित लेखन, कथा असो खेळकर शैलीत मिष्कील भाष्य हा त्यांच्या लेखनाचा गाभा आहे. महिला बचत गटातल्या निरक्षर महिला कशा काम करतात, मोठमोठे हिशेब कसे ठेवतात ह्या कुतूहलापोटी त्यांनी त्या महिलांशी संधान बांधून त्यांचा अभ्यास केला, व त्यातूनच महिला बचत गटावरचा त्यांचा ग्रंथ तयार झाला. लहानपण मुंबईतील पार्ल्यासारख्या सांस्कृतिक शहरात गेल्याने अनेक दिग्गजांची व्याख्याने ऐकायला मिळाली, आणि त्यामुळेच लेखनाचा पाय भक्कम झाल्याचे त्यांनी सांगितले. सध्याची पिढी अशी व्याख्याने आवडीने ऐकत नाही अशी खंतही त्यांनी व्यक्त केली .

त्यांच्या प्रकाशित झालेल्या पुस्तकांची यादी बरीच मोठी आहे, पण झुळूक, निवडक मंगला गोडबोले, ऋतू हिरवट, कथायात्रा, सुनीताबाई, पुरुषोत्तमाय नमः ही आणि अशी अनेक पुस्तके आपले जीवन समृद्ध करतात.

सौ मंगलाताईंच्या व्याख्यानानंतर श्री प्रदीप वाघ ह्यांनी आभार मानून,कार्यक्रमाचा समारोप केला

**उज्वला नाईक**

## प्रतिभाताई मोडक

दि.१८ एप्रिल २०२३ रोजी स्नेहसेवेच्या साप्ताहिक सभेत श्रीमती प्रतिभा शाहू मोडक या बहुपेडी व्यक्तिमत्तवाची आपणास ओळख करून दिली, प्राध्यापक शामराव भुर्के यांनी.

प्रतिभा मोडक ह्या एक कवियित्री आणि साहित्यिक तर आहेतच पण त्यांचा अध्यात्माचा गाढा अभ्यास आहे . प्रसन्न व्यक्तिमत्तवाच्या प्रतिभाताई आयुष्यात ज्या स्थित्यंतरांना सामोऱ्या गेल्या, ते ऐकून आपण सामान्य जन अचंबित होतो, व त्यांच्या धाडसी जीवनापुढे नतमस्तक होतो .

७५ वर्षांपूर्वी बालाघाट येथे एका कर्मठ मारवाडी जैन, हिंदी भाषिक कुटुंबात जन्मलेल्या प्रतिभाताई कोवळ्या वयात जैन साध्वी बनण्याचा निर्णय घेतात. कित्येक वर्षे तो अमलात आणतात, पण स्वस्थ बसत नाहीत. कविता, मंगलाष्टके रचणे, गोड गळ्याने गाणी गाणे, सतत अभ्यासू वृत्ती जोपासणे व नवीन शिकत रहाणे हे सोपे नाही, यात संस्कृत प्राकृत, हस्तसामुद्रिक हे सर्व काही आहे

अशात त्यांची मराठी सिनेसृष्टी गाजविणारे नटश्रेष्ठ शाहू मोडक यांची भेट होते. ते थोर अध्यात्मिक व हस्तसामुद्रिक तज्ज्ञ, पण योगायोगाने दोघांच्या मनाच्या तारा जुळतात व एक अलौकिक प्रवास सुरु होतो. अनेक अडचणींवर मात करत दोघे सुखी सहजीवन व्यतीत करतात.

आयुष्याचा तिसरा टप्पा, शाहूजींच्या वियोगाचा ! पण न डगमगता ही धैर्यवान स्त्री मराठी सांस्कृतिक क्षेत्रांमध्ये पाय रोवून अजूनही उभी आहे. खूप सांगण्यासारखे, पण प्रत्यक्ष ऐकण्यासारखे जास्त!

**डॉ. विद्या शर्मा**

## सभेत कसे बोलावे- नवीन सभासदांची ओळख

आपल्या संस्थेचे ज्येष्ठ सभासद श्री शामराव भुर्के यांनी २५/०४/२०२३ ची संध्याकाळ आपल्या विनोदी शैलीच्या भाषणाने गाजवली. सभेत कसे बोलावे, वक्त्यांची ओळख कशी करून द्यावी, आभार कसे मानावेत ह्या संबधी त्यांनी अनेक महत्वाच्या गोष्टी सांगितल्या. पण कसे बोलावे ह्यापेक्षा कसे बोलू नये, देहबोली कशी नसावी अनावश्यक शब्द कसे टाळावेत ह्याच्या मार्गदर्शनाबरोबरच त्याबाबतच्या किश्श्यांचे अत्यंत उत्कृष्ट सादरीकरण त्यांनी केले, त्यामुळे संपूर्ण तासभर S N D T चा हॉल हास्याच्या कारंज्यात न्हाऊन निघाला होता.

भाषण हा अतिशय भीषण प्रकार आहे असे मानायचे काही कारण नाही. कोणीही स्टेजवर जाऊन चार शब्द बोलायला सांगितले तर संधी मिळाली समजून त्याचे सोने करा. आपला मेंदू त्या क्षणापासून कामाला लागतो, आणि मेंदू शेवट पर्यंत तल्लख राहण्यासाठी, भाषणांचा उपयोग होतो. भाषणाचे मुख्य दोन भाग असतात, Content आणि communication. तुमची तयारी चांगली असेल तर तुम्ही सभा जिंकू शकता. आपल्याला दिलेला वेळ पाळणे, व आपणच मुख्य वक्ता आहोत असे न समजणे, ही आणि अशी अनेक पथ्ये पाळली तर, तुमचे भाषण नक्कीच चांगले होणार अशी ग्वाही श्री भुर्के यांनी दिली.

यानंतर नवीन सभासदांनी आपापला परिचय करून दिला. त्यामध्ये डॉ. श्रीमती प्राची कुलकर्णी, श्री मुकुंद गायधनी, श्री संजय गर्गे, श्रीमती विजया खोले हे सभासद होते.

एप्रिल महिन्यात ज्या सभासदांचे वाढदिवस असतात, त्यांचा गुलाब पुष्प व भेट वस्तू देऊन वाढदिवस साजरा करण्यात आला.

समारोपाच्या भाषणात श्रीमती सुधाताई जावडेकरांनी, भाषण करण्यापूर्वी प्रॅक्टिस, प्रॅक्टिस आणि प्रॅक्टिस हा मंत्र जपण्याचा सल्ला दिला.

कार्यक्रमानंतर ह्या महिन्यातील गट क्र. १ च्या सभासदांनी दिलेल्या भोजनाचा सर्वांनी आस्वाद घेतला, व सभा समाप्त झाली.

**उज्वला नाईक**

### मे महिन्यातील वाढदिवस
### जीवेत् शरदः शतम्

| | |
|---|---|
| *श्री. अविनाश जोशी* | *४ मे* |
| *श्री. दीपक जव्हेरी* | *७ मे* |
| *सौ. नेत्रा वाघ* | *११ मे* |
| *श्री. विनोद दप्तरदार* | *१३ मे* |
| *डॉ. उमा पुरम* | *१७ मे* |
| *डॉ. सौ. ज्योती खंडकर* | *१९ मे* |
| *श्री. विश्वकुमार बडवे* | *२३ मे* |
| ***श्री संजय गर्गे*** | ***२३ मे.*** |
| *डॉ. मुकुंद संगमनेरकर* | *२९ मे* |
| *श्री वसंत खरे* | *३० मे* |

